स्थापना:– जुलै १९९०
ISO. 9001:2008

।। सा विद्या या विमुक्तये ।।

आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी संचलित



# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी
# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडा

ता. आष्टी, जि. बीड (महाराष्ट्र) – ४१४२०२


E-mail : admkada@gmail.com website : www.admkada.com
Facebook Page : Anandrao Dhonde College, Kada


# माहिती पत्रक
## २०१७ – २०१८





डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न



आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालयाची सुसज्ज इमारत

आनंद चॅरिटेबल संस्था आष्टी, संचलित

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय

## (कला, वाणिज्य व विज्ञान)

## कडा, ता. आष्टी, जि. बीड – ४१४ २०२

आष्टी तालुका शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला तालुका म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे तालुक्याच्या प्रगतीला मोठी अडचण निर्माण झाली होती. ग्रामीण भागातील मुला मुलींना उच्च शिक्षण मिळत नव्हते. त्यामुळे उच्चशिक्षण, सरकारी नोकऱ्या, महिलाविकास, तंत्रज्ञान, विकसित व्यवसाय, शेती, स्वयंरोजगार अशा अनेक संधीपासून त्यांना मुकावे लागत असे. शिक्षण घेण्यासाठी शहरी भागाकडे धाव घेतल्याशिवाय तरणोपाय नव्हता. ज्यांची आर्थिक स्थिती बरी आहे असे थोडेच विद्यार्थी शिक्षण घेवू शकत होते. शहरांकडे मुलींना शिक्षणासाठी पाठवणे एक जबाबदारीचे काम वाटत होते. मुलींना शिक्षण देणे पालकाच्या दृष्टीने अशक्य बाब झाली होती. त्यामुळे तालुक्यातील गरीब,कष्टकरी,शेतकरी वर्गातील मुली शिक्षणापासून दूर रहात होत्या.

शिक्षणाशिवाय सर्वांगीण विकास नाही हे **संस्थापक अध्यक्ष आमदार भीमरावजी धोंडे** यांनी अचूक हेरले. तंत्रज्ञान व स्पर्धेच्या युगात टिकून रहावयाचे असेल आणि तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीचे जीवनमान, राहणीमान, आर्थिक स्थिती बदलून सर्वांना स्वावलंबी बनवण्यासाठी **आमदार भीमरावजी धोंडे साहेब** यांनी तालुक्यात शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा महाविद्यालये सुरू केली. आनंद चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून कडा येथे उच्च शिक्षणासाठी **आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय** जून १९९० पासून सुरु केले. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या रूपाने संजिवनी प्राप्त झाली. तालुक्यातील प्रत्येक घरामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. शिक्षणाचे महत्त्व कळले. शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आणि आज तालुका व परिसर शैक्षणिक दृष्ट्या संपन्न बनला आहे. शिक्षणामुळे तालुक्याचा सर्वांगीण विकास झाला आहे.

## महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये

- निसर्गरम्य परीसर व सुसज्ज इमारत.
- महाविद्यालय परीसरात CCTV कॅमेरे कार्यान्वीत आहेत.
- पीएच.डी. झालेले ३२, एम्. फील. झालेले १२ व सेट/नेट झालेले ८ तज्ञ प्राध्यापक.
- महाविद्यालयाचे दहा विद्यार्थी SET/NET पास. व अनेक विद्यार्थी पीएच.डी.
- गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी 'वसंतरावजी काळे कमवा व शिका' योजना.
- निरंतर शिक्षण व विस्तार विभागांतर्गत स्वयंनिर्वाही अभ्यासक्रम उपलब्ध.
- वनस्पतीशास्त्र, मराठी व कॉमर्स या विषयाचे प्रस्तावीत संशोधन केंद्र.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासकेंद्र.
- विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्र.
- अभियांत्रिकी व वैद्यकीय पूर्वपरीक्षेसाठी जादा तासिकेची सोय.
- महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय.
- व्यक्तिमत्व विकास व जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम.

- विद्यापीठ व आंतरविद्यापीठ स्तरावर खेळाडूंचा सहभाग.
- NRC अंतर्गत कॉम्प्युटर लॅब व इंटरनेट सुविधा.
- शेतकरीयन या वार्षिक अंकाचे नियमित प्रकाशन.
- नॅक बेंगलोर कडून मुल्यांकीत महाविद्यालय.
- ISO 9001: 2008 मानांकित महाविद्यालय.
- अद्ययावत व सुसज्ज संगणकीकृत ग्रंथालय.
- अद्ययावत जिमखाना व प्रशस्त क्रीडांगण.
- राष्ट्रीय सेवा योजनेचे तीन स्वतंत्र युनिट.
- विविध कंपन्यांचे कॅम्पस् इंटरव्ह्यू.
- औषधी वनस्पती उद्यान.
- स्वतंत्र्य कॅन्टीन सुविधा.



## प्रवेशाबाबतचे नियम

**प्रवेश अर्जासोबत खालील मूळ कागदपत्र आणि त्याच्या सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे.**

१) शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र (T.C.) व त्याच्या साक्षांकित २ सत्यप्रती

२) मागील वर्षाची मूळ गुणपत्रिका (Mark Memo) व त्याच्या साक्षांकित ३ सत्यप्रती

३) आधार क्रमांकासाठी आधारकार्डची सत्यप्रत.

४) अन्य बोर्डाची किंवा विद्यापीठाची परिक्षा दिली असेल तर स्थलांतर (Migration) प्रमाणपत्र

५) प्रथमवर्ष प्रवेशासाठी (एस.एस.सी.)१० वी गुणपत्रिकेची सत्यप्रत.

६) अलीकडच्या काळातील पासपोर्ट फोटोच्या ३ प्रती प्रवेशासाठी आवश्यक आहेत.

आवश्यक असणारी प्रमाणपत्रे वेळेवर दाखल करण्याची आणि अर्जात अचूक माहिती पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. चुकीची व खोटी कागदपत्रे सादर केल्यास प्राचार्य कोणत्याही क्षणी अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करतील.

## प्रवेश-अर्ज भरताना घ्यावयाची काळजी

१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी माहितीपत्रक लक्षपूर्वक वाचावे. खाडाखोड न करता स्वत:च्या हस्ताक्षरात संपूर्ण प्रवेश अर्ज काळ्या शाईनेच भरावा.

२) अपूर्ण माहिती भरल्यास प्रवेशअर्ज विचारात घेतला जाणार नाही व त्यासंबंधी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३) मुदतीनंतर आलेल्या प्रवेश-अर्जाचा विचार केला जाणार नाही.

## प्रवेश घेतेवेळी खालीलप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

- माहिती पत्रक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ५०
- नोंदणी शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ३०
- प्रवेश शुल्क. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ३०
- बोनाफाईड सर्टिफीकेट फी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- ओळखपत्र शुल्क. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २०
- ग्रंथालय शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ५०
- विद्यापीठ पात्रताशुल्क (औ. बाद विभागातील विद्यार्थी) . . . . . . . . . . . . . . . . रु. ५०
  (औ. बाद. विभागाबाहेरील विद्यार्थी) रु. १०० (महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थी) रु. ५००
- अध्ययन शुल्क कनिष्ठ महाविद्यालय (वार्षिक) ११ वी १९२ व १२ वी रू.२१६
- अध्ययन शुल्क पदवी (वार्षिक) अनु. रू ८०० विनाअनु. रू. १६००
- अध्ययन शुल्क पदव्युत्तर (वार्षिक) (विनाअनुदानित) . . . . . . . . . . . . . . . . . रु. ३०००
- क्रीडा शुल्क. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २०
- जिमखाना शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ५०
- विद्यार्थी सहाय्य निधी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २०
- वैद्यकीय तपासणी शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १५
- विद्यापीठ युवक मंडळ शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २०
- महाविद्यालयीन परीक्षा शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २००
- नियतकालिक शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ७५
- स्नेहसंमेलन शुल्क. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १००
- विद्यार्थी फोरम (संसद). . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- पर्यावरण शुल्क (द्वितीय वर्ष) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १००
- संगणक शुल्क (प्रथम वर्ष). . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १००
- विद्यार्थी कल्याण निधी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- प्रयोग शाळा शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ३००
- टी. सी. फीस . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १००
- महाविद्यालय विकास निधी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २००
- सर्च फी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २०
- आपत्कालीन निधी. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- युवक महोत्सव शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २५
- वसंतराव काळे कमवा व शिका योजना. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- एन. एस. एस. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. १०
- अश्वमेध. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ४
- अविष्कार . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ४
- इंद्रधनुष्य . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ४
- आव्हान . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ४
- अभियान . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ४
- ई– सुविधा (MKCL) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ५०
- संगणक शाळा शुल्क (कॉमर्स शाखा). . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ५००
- सांस्कृतिक उपक्रम शुल्क . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. २५
- विद्यापीठ विकास निधी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रु. ०४

**ओळखपत्र (Identity Card) :-**

प्रत्येक विद्यार्थ्याजवळ महाविद्यालयाचे ओळखपत्र असणे बंधनकारक आहे. ग्रंथालय, वर्गात किंवा इतर कार्यक्रमाच्या वेळी महाविद्यालय परिसरात ओळखपत्र जवळ बाळगणे अत्यावश्यक आहे. ओळखपत्र प्रवेशाचे सर्व कागदपत्र पुर्तता केल्यानंतर मिळेल. ओळखपत्रावर पासपोर्ट आकाराचा स्वतःचा फोटो लावून प्राचार्यांची स्वाक्षरी घेवून ओळखपत्र पूर्ण होईल. ओळखपत्र हरवल्यास रु. ३०/- भरुन दुसरे मिळेल.

**महाविद्यालयातील शैक्षणिक सवलती**

**आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना फी सवलत (EBC):-**

ज्या विद्यार्थ्याच्या पालकाचे मागीलवर्षीचे उत्पन्न ३५०००/- रुपये पेक्षा कमी असेल अशा विद्यार्थ्यास महाराष्ट्र सरकारतर्फे **EBC** ची सवलत मिळते. ही सवलत मिळण्यासाठी विशिष्ट नमुन्यात **EBC** फॉर्म, गुणपत्रकाची सत्यप्रत, इ.बी.सी. आदेश क्रमांक, तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, कुटूंबमर्यादा प्रमाणपत्र इत्यादीची पुर्तता करुन १५ जुलै पर्यंत प्राचार्यामार्फत शासनास सादर केल्यानंतरच इ.बी.सी सवलत मंजूर होईल. इ.बी.सी. फॉर्म न भरणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययन शुल्क स्वत: भरावे लागेल. प्रथम सत्रामध्ये महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्याला अध्ययन शुल्काची (शैक्षणिक फीसची) निम्मी रक्कम व इतर फीसची सर्व रक्कम भरावी लागेल. त्या शिवाय महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

**मागासवर्गीय विद्यार्थ्यास भा. स. शिष्यवृत्ती (G.O.I.)**

ज्या अनुसुचित जाती, अ. जमाती, विमुक्त व भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न ५०,००० रू. आहे अशा विद्यार्थ्याने विहीत नमुन्यातील ऑनलाईन भरलेला स्कॉलरशिप फॉर्म मागील वर्षीचा मान्यता आदेश क्रमांक, तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, गुणपत्रक सत्यप्रत, बँक खाते क्रमांकासाठी पासबुक झेरॉक्स, दाखला व त्यांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडून १५ जुलै पर्यंत ऑनलाईन फॉर्म भरल्यास व त्याची हार्डकॉपी महाविद्यालयात सादर केल्यास भारत सरकार शिष्यवृत्ती मंजूर होते.

**अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती : (Minority Scholarship)**

पदवी य पदव्युत्तर अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या मुस्लीम, शीख, बौध्द, ख्रिश्चन, पारसी, जैन व ज्यु या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना. या शिष्यवृत्तीसाठी बँक खाते क्रमांकासाठी पासबुक झेरॉक्स, आधारकार्ड क्रमांक, गुणपत्रकाची सत्यपत्र, तहसिलदार यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र इ. सादर करावे.

**गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी सहाय्य.**

**शिक्षकांच्या पाल्यांना सवतल (PTC) :** प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांसाठी पी.टी.सी. सवलत मिळते. त्यासाठी आवश्यक कागदपत्रासह फार्म वेळेत दाखल करावा.

**खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (Merit Scholarship)**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इ.१२ वी) प्रमाणपत्र परिक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त

विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे तर्फे राबविण्यात येते.

**दिव्यांग शिष्यवृत्ती : (Disable)**

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाची दिव्यांग शिष्यवृत्ती योजना. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यासाठी एक खिडकी योजना व रॅम्प सुविधा.

**राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्ती :**

मागासवर्गीय विद्यार्थ्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यासाठी इ. १० वी मध्ये ७५ % पेक्षा जास्त गुण प्राप्त असल्यास इ. ११ वी व १२ वी वर्गासाठी राजश्री शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना.

* एस.टी. बसच्या सवलतीच्या दरात प्रवासासाठी विद्यार्थी विद्यार्थीनींना पासची सवलत. महाराष्ट्र शासनाद्वारे एस.टी.महामंडळामार्फत मिळते. ही सवलत मिळण्यासाठी महाविद्यालय एस.टी. महामंडळाकडे शिफारस करते. त्यानुसार सवलतीच्या दरात प्रवास करण्यासाठी विद्यार्थ्यांना पास सवलत मिळते.
* प्रवेशीत विद्यार्थ्याची वार्षिक वैद्यकीय तपासणी सुविधा.

**रोजगार संधी केंद्र :**

पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विविध कंपन्याचे कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित केले जातात.

**निर्भया समिती :**

महाविद्यालयातील विद्यार्थीनीच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यास समिती सहाय्य करते.

**ॲण्टी रॅगिंग कमिटी :**

महाविद्यालयातील विद्याथी/विद्यार्थीनींना निर्भय राहता यावे यासाठी कमिटी काम करते.

**महिला वसतिगृह :**

बाहेर गावावरून महाविद्यालयात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींसाठी वस्तीगृहाची सुविधा उपलब्ध आहे. विद्यापीठ अनुदान मंडळ व संस्था यांच्या एकत्रित अनुदानातून आमच्या महाविद्यालयाने विद्यार्थीनीसाठी वसतिगृह (शै.वर्ष २०१६-१७) पासून सुरू केले आहे. सदर वसतिगृहाची प्रशस्त व सुरक्षीत अशी इमारत उभारली आहे. वसतिगृहाची क्षमता ४० विद्यार्थीनीची असून अत्यल्प दरात मुलीची राहण्याची सोय महाविद्यालयाने केली आहे.

**विद्यार्थी सहाय्य निधी (Student Aid Fund)**

गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना विद्यार्थी सहाय्य निधी तर्फे पुस्तके अथवा आर्थिक स्वरुपात मदत दिली जाते. या निधीतून मदत मिळण्यासाठी प्रवेश घेते वेळी प्राचार्याच्या नावे महाविद्यालयाकडे अर्ज करावा लागतो. प्राचार्य, दोन प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी असलेली समिती अशा अर्जाची छाननी करुन विद्यार्थ्याला मदत करते.

**क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम (Sports & Cultural Programme)**

जिमखाना विभागातर्फे निकोप आरोग्य संवर्धनासाठी मैदानी खेळाचे आयोजन केले जाते.

महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी व खो–खो या शिवाय बॅडमिन्टन, टेबल टेनिस, कॅरम, बुध्दीबळ या सारख्या देशी विदेशी खेळाची व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्याच्या कला गुणांना व कलात्मकतेला वाव मिळण्यासाठी विविध करमणुकीचे व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

**राष्ट्रीय सेवा योजना (NSS)**

विद्यार्थ्यांच्या अंगी सामाजिक मुल्य रूजवणे व विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा. या उद्देशाने विद्यापीठाच्या परवानगीने राष्ट्रीय सेवा योजना विभाग सन १९९३–९४ पासुन महाविद्यालयात सुरू आहे. रा.से.यो. विभागामार्फत समाजासंबंधी असलेल्या ज्वलंत समस्या लक्षात घेवून जनजागृती केली जाते. महाविद्यालयाच्या रा.से.यो.विभागास उत्कृष्ट कार्याबद्दल सन २००६–०७ मध्ये महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट रा.से.यो. युनिट पुरस्कार मिळाला आहे. रा.से.यो. चे तीन युनिट असुन त्यामध्ये २५० स्वयंसेवकांना प्रवेश दिला जातो. कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सामाजिक कार्याची आवड पाहून त्याची निवड केली जाते. त्या करिता प्रवेश घेतल्यानंतर प्राचार्यांच्या नावे अर्ज करणे आवश्यक आहे.

**कमवा आणि शिका योजना (Earn and Learn Scheme)**

महाविद्यालयामध्ये स्व. वसंतराव काळे कमवा आणि शिका योजने अंतर्गत एकुण २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य होवून त्याच्या शिक्षणास हातभार लागावा हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात कमवा आणि शिका योजने अंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबवले जातात.

**स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनकेंद्र (Competitive Exam Guidance Centre)**

स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी टिकण्यासाठी महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र चालवले जाते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत दररोज विविध विषयाचे अनुभवी प्राध्यापक तासिका घेतात त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करणे सहज शक्य होते. या शिवाय कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्याला प्राचार्यांच्या नावे अर्ज करून या मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घेता येतो.

**राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा:**

आमचे प्रेरणा स्त्रोत स्व. आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी यांच्या स्मृती प्रित्यर्थ महाविद्यालयामध्ये आनंदराव धोंडे आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धे करीता महाराष्ट्राच्या विविध भागातून स्पर्धकांचा भरघोस प्रतिसाद मिळतो. विजेत्या संघास फिरता करंडक देऊन व विजेत्या स्पर्धकास रोख स्वरूपात बक्षीस देऊन व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येते.

**पारितोषीक :**

बी.ए. पदवी परिक्षेत महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थांस **गुरूवर्य प्राचार्य हरिदास विधाते पारितोषीक** प्रसिद्ध साहित्यिक श्री. आ.य.पवार जामखेड यांच्या वतीने देण्यात येते.

## कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने निवडावयाचे अभ्यासक्रम व विषय

**अ) कला शाखा** (इयत्ता ११ वी व १२ वी)

| | | |
|---|---|---|
| १) इंग्रजी (अनिवार्य) | २) हिंदी / मराठी (SL) | ३) भूगोल |
| ४) शिक्षणशास्त्र | ५) मानसशास्त्र | ६) राज्यशास्त्र |

**ब) विज्ञान शाखा** (इयत्ता ११ वी व १२ वी)

| | | |
|---|---|---|
| १) इंग्रजी (अनिवार्य) | २) हिंदी / मराठी (SL) | ३) भौतिकशास्त्र |
| ४) रसायनशास्त्र | ५) जीवशास्त्र | ६) गणित |

**११ वी १२ वी कला/विज्ञानसाठी ५० गुणाचा पर्यावरणशास्त्र हा विषय अनिवार्य आहे.**

## वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने निवडावयाचे अभ्यासक्रम व विषय

कला वाणिज्य व विज्ञान शाखांचा अभ्यासक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी निर्धारीत केल्या प्रमाणे राहील.

बी. ए., बी. कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्गातील विद्यार्थ्यांना संगणकशास्त्राचा १०० मार्काचा कोर्स करणे आनिवार्य आहे. विद्यार्थी जर MS-CIT परीक्षा पास असेल तर संगणकशास्त्राचा कोर्स करणे व परिक्षा देणे आवश्यक नाही. त्याकरिता MS-CIT परीक्षा पास प्रमाणपत्र जमा करणे आवश्यक आहे.

द्वितीय वर्षाला पर्यावरणशास्त्राचा १०० मार्काचा कोर्स पूर्ण करणे व त्याची परिक्षा पास होणे विद्यापीठ नियमाप्रमाणे बंधनकारक आहे वरील दोन्ही कोर्स पूर्ण केल्याशिवाय तृतीय वर्षाचा वार्षिक परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

## --● कला शाखा ●--

### ● बी. ए प्रथम वर्ष :

**प्रथम सेमिस्टर - पेपर I, II**

१) इंग्रजी (अनिवार्य)
२) मराठी / हिंदी (S.L.)

**ऐच्छिक 'अ' ग्रुप I, II, III, IV**

3) मराठी / हिंदी / इंग्रजी (ऐच्छिक)
४) इतिहास (ऐच्छिक)
५) समाजशास्त्र/राज्यशास्त्र (ऐच्छिक)

**द्वितीय सेमिस्टर - पेपर III, IV**

१) इंग्रजी (अनिवार्य)
२) मराठी / हिंदी (S.L.)

**ऐच्छिक 'ब' ग्रुप I, II, III, IV**

3) मराठी / हिंदी / इंग्रजी
४) अर्थशास्त्र / लोकप्रशासन
५) भूगोल / शा. शिक्षण / नाट्यशास्त्र / मानसशास्त्र

**ऐच्छिक 'क' ग्रुप I, II,**

3) इतिहास

४) समाजशास्त्र/राज्यशास्त्र (ऐच्छिक)

५) अर्थशास्त्र/लोकप्रशासन

**ऐच्छिक 'ड ' ग्रुप I, II,**

3) भूगोल / शा. शास्त्र / नाट्यशास्त्र

४) मराठी / हिंदी /इंग्रजी

५) राज्यशास्त्र / समाजशास्त्र

## • बी. ए. द्वितीय वर्ष :

**प्रत्येक सेमिस्टरला अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा मराठी किंवा हिंदी यांचा ५०-५० गुणांचा दोन तासांचा पेपर राहील. तसेच ऐच्छिक विषयासाठी ५०-५० गुणांचा दीड तासाचा पेपर राहील.**

**सत्र तिसरे V, VI**

१) इंग्रजी (अनिवार्य)

२) मराठी / हिंदी (S.L.)

**ऐच्छिक 'अ' ग्रुप**

३) मराठी/हिंदी/इंग्रजी

४) इतिहास

५) समाजशास्त्र/राज्यशास्त्र

**ऐच्छिक 'क' ग्रुप**

3) इतिहास

४) समाजशास्त्र/राज्यशास्त्र (ऐच्छिक)

५) अर्थशास्त्र/लोकप्रशासन

**सत्र चौथे , VII, VIII**

१) इंग्रजी (अनिवार्य)

२) मराठी / हिंदी (S.L.)

**ऐच्छिक 'ब' ग्रुप**

3) मराठी / हिंदी / इंग्रजी

४) अर्थशास्त्र / लोकप्रशासन

५) भूगोल / शा. शिक्षण / नाट्यशास्त्र / मानसशास्त्र

**ऐच्छिक 'ड' ग्रुप**

3) भूगोल / शा. शास्त्र / नाट्यशास्त्र

४) मराठी / हिंदी /इंग्रजी

५) राज्यशास्त्र / समाजशास्त्र

## • बी. ए. तृतीय वर्ष :

**प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची दिड तासाची परीक्षा राहील.**

**प्रथम व द्वितीय वर्षामध्ये निवडलेले ऐच्छिक विषय तृतीय वर्षासाठी राहतील व त्यामधुनच एक विषय स्पेशल विषय म्हणून निवडावा लागेल.**

**पाचवे सेमिस्टर - पेपर IX, X, XI, XII प्रकल्प)**

**सहावे सेमिस्टर - पेपर XIII, XIV, XV, XVI, प्रकल्प)**

---

## एम. ए. मराठी प्रथम वर्ष

**प्रत्येक सेमिस्टरला Choice Based Cradit & Grading System CBS / GS**

**प्रथम वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची २:०० तासाची परीक्षा राहील.**

**सत्र पहिले**

१) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास

२) साहित्य समीक्षेची मुलतत्त्वे - III

३) वाङ्मय प्रकार - V

४) एका लेखकाचा अभ्यास -VII

**सत्र दुसरे**

५) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास - II

६) साहित्य समीक्षेच्या पध्दती - IV

७) वाङ्मय पक्रार - VI

७) एकालेखकाचा अभ्यास - VIII

---

## एम. ए. मराठी द्वितीय वर्ष

**द्वितीय वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची २.०० तासाची परीक्षा राहील.**

**सत्र तिसरे**

१) वर्णनात्मक भाषा विज्ञान - IX

२) आधुनिक वाङ्मयातील प्रवाह - XI

३) लोकसाहित्य - XIII

४) मराठवाड्यातील आधुनिक साहित्य-XV

**सत्र चौथे**

५) मराठी भाषेचा अभ्यास - X

६) आधुनिक वाङ्मयातील प्रवाह स्त्रीवादी आदि-XII

७) लोक वाङमय प्रकार - XIV

८) मराठवाड्यातील आधुनिक साहित्य - XVI

९) कोर्सवर्क - XVII

## --● विज्ञान शाखा ●--

### *B.Sc. First Year* Semester - I

प्रथम वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची १:३० तासाची परीक्षा राहील.

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) English (Comp.) | 1) English (Comp.) | 1) English (Comp.) |
| 2) Marathi / HIndi (S.L.) | 2) Marathi / HIndi (S.L.) | 2) Marathi / HIndi (S.L.) |
| 3) Chemistry - Pr - I, II, III | 3) Chemistry - Pr - I, II, III | 3) Physics - Pr - I, II, III |
| 4) Physics - Pr - I, II, III | 4) Botany - Pr - I, II, III | 4) Mathematics - Pr - 101, 102 |
| 5) Mathematics - 101,102 | 5) Zoology - Pr - I, II, III | 5) Electronics - Pr - I, II, III |

### *B.Sc. First Year* Semester - II

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) English (Comp.) | 1) English (Comp.) | 1) English (Comp.) |
| 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) |
| 3) Chemistry - Pr - IV, V, VI | 3) Chemistry - Pr - IV, V, VI | 3) Physics - Pr - IV, V, VI |
| 4) Physics - Pr - IV, V, VI | 4) Botany - Pr - IV, V, VI | 4) Mathematics - Pr - 201, 202 |
| 5) Mathematics - 201, 202 | 5) Zoology - Pr - IV, V, VI | 5) Electronics - Pr - IV, V, VI |

### *B.Sc. Second year* Semester - III

द्वितीय वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची १:३० तासाची परीक्षा राहील.

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) English (Comp.) | 1) English (Comp.) | 1) English (Comp.) |
| 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) |
| 3) Chemistry - Th - VII, VIII, IX | 3) Chemistry - Th - VII, VIII, IX | 3) Physics - Th - VII, VIII, IX, X |
| 4) Physics - Th - VII, VIII, IX, X | 4) Botany - Th -VII, VIII, IX, X | 4) Mathematics - 301, 302, 303 |
| 5) Mathematics - 301, 302, 303 | 5) Zoology - Th - VII, VIII, IX, X | 5) Electronics - VII, VIII, IX, X |

## B.Sc. Second year Semester - IV

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) English (Comp.) | 1) English (Comp.) | 1) English (Comp.) |
| 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) | 2) Marathi / Hindi (S.L.) |
| 3) Chemistry - Th - X, XI, XII | 3) Chemistry - Th - X, XI, XII | 3) Physics - Th - XI, XII, XIII, XIV |
| 4) Physics - Th - XI, XII, XIII, XIV | 4) Botany - Th - XI, XII, XIII, XIV | 4) Mathematics - 401, 402, 403 |
| 5) Mathematics - 401, 402, 403 | 5) Zoology-Th - XI, XII, XIII, XIV | 5) Electronics -Th - XI, XII, XIII, XIV |

## B.Sc. Third year Semester - V

**तृतीय वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची १.३० तासाची परीक्षा राहील.**

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) Chemistry - Th - XIII, XIV, XV, | 1) Chemistry - Th - XIII, XIV, XV | 1) Physics - Th - XVII, XVIII,XIX,,XX |
| 2) Physics - Th - XV, XVI, XVII, XVIII | 2) Botany - Th - XV, XVI,XVII,XVIII | 2) Mathematics - 501, 502, 503 |
| 3) Mathematics - 501, 502, 503 | 3) Zoology - Th - XV, XVI, XVII, XVIII | 3) Electronics - Th - XV, XVI, XVII, XVIII |

## B.Sc. Third year Semester - VI

| Group 'A' | Group 'B' | Group 'C' |
|---|---|---|
| 1) Chemistry - Th - XVI, XVII, XVIII | 1) Chemistry - Th - XVI, XVII, XXIII,XXIV | 1) Physics - Th - XXI, XXII, XXIII,XXIV |
| 2) Physics - Th - XIX, XX, XXI, XXII | 2) Botany - Th - XIX, XX, XXI,XXII | 3) Mathematics - 601, 602, 603 |
| 3) Mathematics - 601, 602, 603 | 3) Zoology - Th - XIX, XX, XXI, XXII | 3) Electronics- Th - XIX, XX, XXI, XXII |

## हे आवश्य वाचा

विद्यार्थ्यांनी विद्याभ्यासाला अग्रक्रम द्यावा व शिस्तीचे पालन करण्याची सवय करावी. गुरुजनांविषयी आदर असावा. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाची सुख–दुःखे आपण ओळखावी. केवळ नोकरी हे शिक्षणाचे व विद्यार्थी जीवनाचे ध्येय असू नये. नम्र झाला भूता, त्याने कोंडिले अनंता ! महापुरे झाडे जाती तेथे लव्हाळे वाचती !! या प्रमाणे विद्यार्थ्याच्या अंगी नम्रता व ज्ञान मिळवण्याची चिकाटी असल्यास सर्व काही साध्य करता येणे सहज शक्य आहे.

## --● वाणिज्य शाखा ●--

### *B.Com. First Year*

प्रथम वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची २:०० तासाची परीक्षा राहील.

**First Semester**

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) I.T. Application in Business - I
4) Entrepreneurship Development I
5) Business & Industrial Eco. I
6) Business Math & Stat I
7) Financial Accounting - I

**Second Semester**

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) I.T. Application in Business - II
4) Entrepreneurship Development II
5) Business & Industrial Economics II
6) Business Math & Stat II
7) Financial Accounting - II

### *B.Com. Second Year*

द्वितीय वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची २:०० तासाची परीक्षा राहील.

**Third Semester**

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) I.T. Application in Business - III
4) Principles of Business Management - I
5) Corporate Accounting - I
6) Business Regulatory Framework - I
7) Marketing Management - I

**Fourth Semester**

1) English (Comp.)
2) Marathi / Hindi (S.L.)
3) I.T. Application in Business - IV
4) Principles of Business Management - II
5) Corporate Accounting - II
6) Business Regulatory Framework - II
7) Marketing Management - II

### *B.Com. Third Year*

तृतीय वर्षासाठी प्रत्येक सेमिस्टरला ५०+५० मार्काची २:०० तासाची परीक्षा राहील.

**Fifth Semester**

1) Advanced Financial Accounting - I
2) Manasement Accounting - I
3) Indirect Tax - I
4) Cost Accounting - I
5) New Auditing Trends - I
6) (Optional) (Any one)
i) Information & Communication Technology - I
ii) Banking -& Insurance I
iii) Rural Development & Agricultural Marketing I

**Sixth Semester**

1) Advanced Financial Accounting - II
2) Manasement Accounting - II
3) Indirect Tax - II
4) Cost Accounting - II
5) New Auditing Trends - II
6) (Optional) (Any one)
i) Information & Communication Technology - II
ii) Banking -& Insurance II
iii) Rural Development & Agricultural Marketing II

## M.Com. I, Year

Choice Based Credit & Grading System (CBC & GS)

### M.Com. I, Semester

1) Management Process & Organizational Behavior
2) Managerial Economics
3) Corporate Financial Accounting

**ELECTIVE (Anyone)**

1) Business Environment
2) Statistical Analysis

### M.Com. II, Semester

1) Advanced Cost Accounting
2) Marketing Management
3) Financial Management

**ELECTIVE (Anyone)**

1) Strategic Management
2) E-Business

## M.Com. II, Year

### M.Com. III, Semester

1) Research Methodology
2) Human Resource Planning & Development
3) Business Legislation

**ELECTIVE (Anyone)**

1) International Marketing
2) Accounting for Managerial Decision

### M.Com. IV, Semester

1) Quantitative Techniques
2) Security Analysis
3) Research Project

**ELECTIVE (Anyone)**

1) Advertising
2) International Business

# E-COMMERCE

आमच्या महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगांतर्गत (COP) वाणिज्य विभागात E-Commerce हा कोर्स चालवला जातो. यामध्ये खालील Certificate Courses शिकविले जातात.

| | | |
|---|---|---|
| (I) | Certificate Course in E-Commerce | 400 marks |
| (II) | Diploma Course in E-Commerce | 400 marks |
| (III) | Advance Diploma in E-Commerce | 400 marks |
| | Total | 1200 marks |

वरील तीन Certificate Course, चे प्रवेश प्रत्येकवर्षी १५ जुलै पर्यंत घेता येतात. हे कोर्स B.A., B.Com व B.Sc. करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना करता येतात जो विद्यार्थी वरील तीन कोर्स पूर्ण करील त्यास विद्यापीठाकडून E- Commerce ही 'पदवी' प्राप्त होते.

### आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग :-

आमच्या महाविद्यालयास डॉ.बाबासाहेब आंबेडकर म. विद्यापीठाने ' आजीवन शिक्षण आणि विस्तार' विभागास २०११-१२ पासून मंजूरी दिली आहे. या विभागामध्ये ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यांना सहभागी विद्यार्थी म्हणून संबोधले जाते. सहभागी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजस्तर आणि महाविद्यालय स्तरावर विविध उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर दोन दिवसांचे ' विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन केले जाते. सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ व्यक्तींना आमंत्रीत केले जाते. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येते.

आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद मार्फत चालवले जाणारे स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमास विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१३ - १४ मध्ये मंजुर केलेले आहेत, हे अभ्यासक्रम महाविद्यालय व समाजिक स्तरावर राबविले जातात. शिक्षणा बरोबरच समाजातील प्रश्नांची जाणीव व्हावी. विद्यार्थांच्या व्यक्तीमत्वाचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांच्या अंगी सुसंस्कार व सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी त्याच बरोबर विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा. हा या अभ्यासक्रमामागील मुख्य हेतु आहे.

सदर विभागाअंतर्गत स्वयंरोजगारावर आधारीत खालील अभ्यासक्रम राबविले जातात.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | पात्रता | शुल्क | कालावधी | क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| १) | इंग्रजी संवाद कौशल्ये | १२ वी पास | १०५० | ६ महिने | ६० |
| २) | ग्रंथालय व्यवस्थापन | १२ वी पास | १०५० | ३ महिने | ५० |
| ३) | विक्री प्रतिनिधी | १० वी पास | ५०० | २ महिने | ५० |

वरील विभागास साधन व्यक्ती तसेच लागणाऱ्या सर्व आवश्यक सोयी सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध आहेत. विद्यार्थी विद्यार्थिनींनी वरील ज्ञान शाखेचा फायदा घेतात.

**प्रा.डॉ.आव्हाड बी.बी.**
समन्वयक
**आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग**

**प्रा. रणदिवे बी.ए.**
साधनव्यक्ति
इंग्रजी संवाद कौशल्ये

**प्रा.डॉ सांगळे एस. टी.**
साधनव्यक्ति
ग्रंथालय व्यवस्थापन

**प्रा. डॉ. वाघुले एस.एन.**
साधनव्यक्ति
विक्री प्रतिनिधी

# आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि.बीड

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ नाशिक-अभ्यासकेंद्र क्र. २२१७ A आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय, कडा, ता. आष्टी, जि. बीड ४१४२०२

ज्ञान गंगा घरोघरी या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र जानेवारी १९९९ पासुन सुरू आहे. नोकरी व व्यवसाय करता-करता पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय अभ्यासकेंद्रामध्ये उपलब्ध आहे. खालील प्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

**१) पुर्वतयारी प्रवेश पात्रता :-**

जून, जुलै व डिसेंबर, जानेवारी मध्ये पुर्वतयारी शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर **बी. ए. किंवा बी. कॉम.** प्रथम वर्षाला प्रवेश घेता येतो. जुन, जुलैमध्ये पुर्वतयारी शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑगस्ट मध्ये होते. व त्यांना लगेच **बी. ए. किंवा बी. कॉम.** प्रथम वर्षाला प्रवेश घेता येतो.

**२) पुर्वतयारी प्रवेश पात्रता :-**

अ) किमान चौथी पास    ब) १०वी किंवा १२ वी नापास    क) वयाची १८ वर्ष पुर्ण

- **बी.ए. बी. कॉम प्रवेश पात्रता :-**

अ) कुठल्याही शाखेच्या १२वी पास विद्यार्थ्यांला बी.ए. बी.कॉम. प्रथम वर्षाला प्रवेश घेता येतो.

ब) १२ वी नंतर डी. एड.पास विद्यार्थ्यांला बी.ए. द्वितीय वर्षाला प्रवेश मिळतो.

- **एम.ए. एम. कॉम एम एस्सी (प्रवेश पात्रता) :-**

अ) कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी पुर्ण केलेल्या विद्यार्थास पदव्युत्तर अभ्यासक्रमाला (विषय संप्रेषणव,शैक्षणिक संप्रेषण) प्रवेश घेता येईल.

- **एम.बी. ए. Courses :- 1) Human Resource Management 2) Marketing 3) Finance**

**प्रवेश पात्रता :-**

अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

ब) अभियांत्रीकी पदवी प्राप्त विद्यार्थी.

- **एम. ए. (विषयानुसार प्रवेश) :-**

अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

ब) मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन या विषयांपैकी कोणताही एक विषय घेऊन दोन वर्षाचा एम.ए. अभ्यासक्रम पुर्ण करता येईल.

---


**प्रा. डॉ. अशोक माळशिखरे**
केंद्रसंयोजक
मो. ९४२०४१२२१९

**प्राचार्य डॉ. हरिदास जी. विधाते**
केंद्रप्रमुख

**प्रा. डॉ. गोरक्ष पठारे**
सहाय्यक केंद्रसंयोजक
मो. ९४२१३४०९०७

**प्रा. डॉ. भास्कर चव्हाण**
केंद्र संयोजक (पी. जी)
मो. ९४२१११३४५६


---

**कामकाजाची वेळ :- रोज दुपारी २ ते ५ व रविवार सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत**

## ACADEMIC CALENDER- *2017-18*

| Sr. No. | Date | Particulars | Organizing Dept. |
|---|---|---|---|
| 1 | 15th June 2017 | Opening Day | ******* |
| 2 | 15th - 20th June 2017 | Admission process for ( IIIrd & Vth Semester) | ******* |
| 3 | 21st June 2017 | Commencement of Teaching for IIIrd & Vth Semester<br>International Day of YOGA | In charge Professors |
| 4 | 26th June 2017 | Anti-toxication day, Celebration of Shahu Maharaj Birth Anniversary | Dept. of Sociology & History |
| 5 | 1st Jul 2017 | Agriculture Day | Dept. of Botany |
| 6 | 09th July 2017 | Last date for admission of the students (First Year) | |
| 7 | 11th Jul 2017 | World population day | Dept. of Sociology |
| 8 | 13th Jul 2017 | Welcome Programme, Principal's Address for students. | In charge Professors |
| 9 | 18th Jul 2017 | Annabhau Sathe Death Anniversary | In charge Professors |
| 10 | 25th Jul 2017 | NSS Registrations | NSS P. O. |
| 11 | 26th Jul 2017 | Kargil Vijay day celebration,<br>Inauguration of career guidance and Competitive exam | Dept. of History<br>Dept. of Competitive Exam |
| 12 | 31th Jul 2017 | Work shop for Scholarship holder students | Office Superintendent |
| 13 | 1st Aug.2017 | Birth Anniversary of Annabhau Sathe | Dept. of Marathi |
| 14 | 5th Aug.2017 | Blood Donation Camp on the occasion of Birth Anniversary of founder President of our Institute Hon'ble Bhmraodji Dhonde (MLA-Ashti/Patoda) | Dept. of Zoology & NSS |
| 15 | 7th Aug. 2017 | Raksha Bandhan | All |
| 16 | 9th Aug.2017 | Kranti Din (Revolution Day), Books Exhibition | Dept. of History &Library |
| 17 | 14th Aug.2017 | Selection of Students for Earn and Learn Scheme | Dept. of Earn & Learn |
| 18 | 15th Aug.2017 | Independence Day Flag Hosting , Tree Plantation. | All |
| 19 | 17th Aug.2017 | International Youth Day | In charge professors |
| 20 | 23rd Aug. 2017 | University foundation Day | All |
| 21 | 25th Aug.2017 | Sadbhavana Divas | Dept. of NSS |
| 22 | 31th Aug. 2017 | Last date of University Eligibility | ****** |
| 23 | 5th Sept. 2017 | Teacher's Day | In charge Professors |
| 24 | 7th Sept.2017 | Unit Test Starts | Exam Dept. |
| 25 | 8th Sept. 2017 | International Literacy Day | NSS Dept. |
| 26 | 11th Sept. 2017 | Elocution and Debate Competition | Dept. of Marathi |
| 27 | 14th Sept. 2017 | Hindi Day | Dept. of Hindi |
| 28 | 16th Sept. 2017 | Ozone Day | Dept. of Botany & Zoology |
| 29 | 17th Sept. 2017 | Hyderabad Mukti Sangram Day | Dept. of History |
| 30 | 18th Sept. 2017 | Environmental Awareness Day | Dept. of Geography |
| 31 | 24th Sept. 2017 | NSS Day | Dept. of NSS |
| 32 | 2nd Oct. 2017 | Mahatma Gandhi & Lal Bahaddur Shashtri Birth Anniversaries | Dept. of History |
| 33 | 5th Oct. 2017 | Camp for competitive exam and vocational guidance | Dept. of Competitive exam |
| 34 | 14th Oct. 2017 | Last working Day of First term<br>State Level Anandrao Dhonde Oratory Competition | Dr. B. S. Khaire,<br>Dr. G. P. Bodkhe |
| 35 | 15th Oct. 2017 | Vachan Prerna Din | Library |
| 36 | 16 th Oct. 2017 to 5th Nov. 2017 | Winter Vacations | ****** |
| 37 | 06th Nov. 2017 | Opening Day of Second Term, Staff Meeting | All |
| 38 | 06th Nov. To 01 Dec. 2017 | Term End Examination | ***** |
| 39 | 28th Nov. 2017 | Mahatma Phule Death Anniversary | Dept. of History |
| 40 | 1st Dec. 2017 | World AIDS Awareness Day | Dept. of NSS & Sociology |

| | | | |
|---|---|---|---|
| 41 | 6th Dec.2017 | Dr. Babasaheb Amberdkar's (Death Anniversary) / Samta Rally | Dept. of Pol. Science |
| 42 | 18th Dec.2017 | National Integration Day, Untouchability eradication Day | Dept. Pub. Admn. & Sociology |
| 43 | 20th Dec.2017 | Gadge Baba Death Anniversary | Dept. of NSS |
| 44 | 24th Dec.2017 | World Consumer Day | Dept. of Commerce |
| 45 | 25th Dec. 2017 | Birth Anniversary of Madan Mohan Malviya | Dept. of English |
| 46 | 30th Dec. 2017 to 5th Jan. 2018 | Annual 7 days N.S.S. Camp | All Programme Officers |
| 47 | 1st Jan. 2018 | Wel come to New Year 2017 | In charge professors |
| 48 | 3rd Jan. 2018 | Birth Anniversary of Savitribai Phule | Women Forum |
| 49 | 10th Jan. 2018 | Essay writing, Debating, worse reading etc. competition | Dept. of Marathi & Hindi |
| 50 | 12th Jan. 2018 | Birth Annivarsary of Swami Vivekanand and Jijau, National Youth Day | Dept. of English |
| 51 | 14th Jan.2018 | Flag Hosting, University Name extension Day. | All Student and Staff |
| 52 | 25th Jan. 2018 | National Voters Day | Dept. of Pub. Admin. |
| 53 | 26th Jan. 2018 | Republic Day | All |
| 54 | 30th Jan. 2018 | Death Anniversary of Mahatma Gandhi | Dept. of Pol. Science |
| 55 | 6th - 7th Feb.2018 | Annual Social Gathering | Cultural Dept. |
| 56 | 19th Feb.2018 | Shiv Jayanti, Parent Meet | Dept. of History |
| 57 | 26th Feb.2018 | Swa. Sawarkar Death Anniversary | Dept. of History |
| 58 | 27th Feb.2018 | Marathi Language Day | Dept. of Marathi |
| 59 | 28th Feb.2018 | Science Day | Faculty of Science |
| 60 | 7th Mar. 2018 | University Annual Exam Starts | ****** |
| 61 | 8th Mar. 2018 | Women's Day | Women's Forum |
| 62 | 10th Mar. 2018 | Death Anniversary of Savitribai Phule | Women's Forum |
| 63 | 14th Mar. 2018 | Birth Anniversary of Yashwantrado Chavan, | Dept. of Marathi |
| 64 | 17th Mar. 2018 | World Physically Challenged Day | In charge Professors |
| 65 | 21st Mar. 2018 | Forest Day | Dept. of Geography |
| 66 | 22nd Mar. to 20th Apr. 2018 | Term End Examination | All |
| 67 | 24th Mar. 2018 | World Weather Day | Dept. of Geography |
| 68 | 1st Apr. 2018 | Birth anniversary of Vasantrao Kale | Dept. of Earn & Learn |
| 69 | 7th Apr. 2018 | World Health Day | Dept. of Zoology |
| 70 | 11th Apr. 2018 | Birth Anniversary of Mahatma Jyotiba Phule | Dept. of Sociology |
| 71 | 14th Apr. 2018 | Birth Anniversary of Dr. Babasaheb Ambedkar | Dept. of Sociology |
| 72 | 23rd Apr. 2018 | Worlds Book Day | Library |
| 73 | 2nd May to 14th June 2018 | Summer Vacation | ******** |
| 74 | 1st June 2018 | Declaration of Results | ******** |
| 75 | 15th June 2018 | Opening of Academic Year 2018-19 | ******** |

**Principal**

## ग्रंथालय वैशिष्ट्ये

- ग्रंथालयात १५ वर्तमानपत्रे व विविध विषयांचे ६० पेक्षा अधिक नियतकालिके नियमित आहेत.
- ग्रंथालयात कथा, कादंबऱ्या, नाटके व त्यावर टिकात्मक परिक्षणे यांचा मोठा संग्रह आहे.
- ग्रंथालयात विविध महापुरुषांची चरित्रे, विश्वकोश, शब्दकोश आदि ग्रंथांचा खजिना आहे.
- ग्रंथालय सोल (SOUL) सॉफ्टवेअरच्या माध्यमातून जून २००९ पासून संगणकीकृत.
- ग्रंथालयात आंतरग्रंथालयीन (Inter Labrary Loan Facility) सुविधा आहे.
- ग्रंथालयात बाह्यवाचक (External Readers Facility) सुविधा आहे.
- ग्रंथालयात स्पर्धापरीक्षेसाठी भरपूर ग्रंथसंपदा उपलब्ध आहे.
- ग्रंथालयात ग्रंथ राखून ठेवण्याची सुविधा आहे.
- ग्रंथालयात 'बुक बँक' सुविधा आहे.
- ग्रंथालयात OPAC सुविधा आहे.
- डिस्पेस सॉफ्टवेअर सुविधा उपलब्ध.

## ग्रंथालयाचे नियम व अटी

- लायब्ररी कार्ड घेण्यासाठी विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र व अॅडमिशन पावती असणे आवश्यक आहे.
- पुस्तक सात दिवसासाठी दिले जाते. सात दिवसानंतर जमा केल्यास प्रति दिवसाला एक रुपया दंड आकारण्यात येईल.
- पुस्तक गहाळ झाल्यास किंवा फाटल्यास पुस्तकाची दीडपट किंमत भरावी लागेल.
- लायब्ररी कार्ड अहस्तांतरणीय आहे. कार्डचा वापर विद्यार्थ्याने स्वतःसाठीच करावा.
- प्रत्येक विद्यार्थ्याला तीन पुस्तके दिली जातात.
- ग्रंथालयात शांतता पाळावी.

**ग्रंथपाल डॉ.एस.टी. सांगळे**

## विद्यापीठ परीक्षा:

विद्यापीठाने निर्धारीत केल्याप्रमाणे प्रत्येक सेमिस्टर नंतर विद्यापीठाकडून परीक्षा घेण्यात येते सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसण्यासाठी वेळेवर फॉर्म दाखल करणे आवश्यक आहे तसेच विद्यापीठाने ठरवून दिलेली परीक्षा फीस व महाविद्यालयाची फीस याची बाकी विद्यार्थ्याने विहित मुदतीत भरली पाहिजे नसता परीक्षा फॉर्म पाठवला जाणार नाही त्यामुळे परीक्षेस बसता येणार नाही. एकदा भरलेली फीस कुठल्याही सबबीवर परत केली जाणार नाही.

### परीक्षेसंबंधी संभाव्य तारखा

| परीक्षेचे नांव | परीक्षा फॉर्म भरणे | परीक्षेची संभाव्य तारीख |
|---|---|---|
| प्रथम सत्र | १५ ते ३१ ऑगस्ट | २० ते ३० नोव्हें |
| द्वितीय सत्र | १५ ते ३१ डिसेंबर | १० मार्च पासून |

**टीप :** परीक्षेच्या प्रत्यक्ष तारखा नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.